महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०० /२०२३ दि. १२/१२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी**, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कल्याण** वाहतूक उपविभागाचे हद्दीत गायत्री कन्स्ट्रक्शन तर्फे म्हसकर हॉस्पिटल, भगवान मेडिकल मुरबाड रोड ते रामबाग लेन नं. ४ अशा सुमारे १२० मीटर रस्त्याचे खोदकाम करून कॉक्रीटीकरण करण्यात येणार आहे. सदर रस्ता अरूंद असल्याने काम करतेवेळी सदर रस्ता बंद करून वाहतूक वळविण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मधुरिमा स्वीटस् संतोषी माता रोड कडून सुभाष चौक, म्हसकर हॉस्पिटल कडे जाणाऱ्या सर्व दुचाकी, हलक्या, मध्यम, जड अवजड वाहनांना **मधुरिमा स्वीटस्** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सर्व प्रकारची दुचाकी व हलकी वाहने संतोषी माता रोडने मॅक्सी ग्राउंड येथून उजवे वळण घेवून मुरबाड रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सर्व प्रकारची मालवाहू, जड अवजड वाहने, खाजगी व शासकीय बसेस संतोषी माता रोड, पौर्णिमा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) म्हसकर हॉस्पिटल कडून रामबाग लेन नं. ४ कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **म्हसकर हॉस्पिटल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सर्व प्रकारची दुचाकी, चार चाकी हलकी, मध्यम वाहने सुभाष चौक येथून उजवे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

ब) सर्व प्रकारची मालवाहू, जड अवजड वाहने पौर्णिमा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. १२/१२/२०२३ रोजीपासून ०१ महिन्यांकरीता अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ कल्याण वाहतूक विभाग, ठाणे शहर व कल्याण वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner